




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784








वर्ष ३ रे अंक : १८९ वा गुरूवार दि ११ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# ठाकरेंच्या बैठकीत ठरलं,भारत-पाक सामन्याला विरोध, मोदींची कोंडी करणार; १४ सप्टेंबरला विशेष मोहीम

**वृत्तसंस्था/मुंबई**

: आशिया कपमध्ये १४ सप्टेंबर रोजी होत असलेल्या भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्याला विविध राजकीय पक्षांकडून विरोध केला जात आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याला काही महिनेच लोटले असताना पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळण्याचा निर्णय घेतला गेल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. उद्धव ठाकरे यांनी बैठक घेतली आणि त्यात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अबुधाबीला भारत-पाक सामना खेळवला जात आहे आणि ही गोष्ट लोकभावनेच्या विरोधात आहे. पहलगाम हल्ल्यात जे २६ निरपराध लोक मारले गेले त्यांच्या कुटुंबाचा आक्रोश अजूनही आपण पाहतोय. त्यामुळे पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळण्याच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी शिवसेनेची महिला आघाडी १४ सप्टेंबर रोजी विशेष मोहीम राबवेल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महिलांकडून सिंदूर पाठवण्यात येईल, अशी माहिती ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी दिली. मोदी सरकारवर हल्लाबोल करताना संजय राऊत पुढे म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर सुरू आहे असं तुम्ही म्हणत आहात. पाकिस्तानचे कंबरडे मोडू, असं पंतप्रधान आणि संरक्षण मंत्री म्हणाले. तसंच रक्त आणि पाणी एकत्र वाहणार नाही, असंही ते म्हणाले. मग आता रक्त आणि क्रिकेट एकत्र कसं चालतंय? विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचं याबद्दल म्हणणं काय आहे ते सांगावं. शिवसेनेची महिला आघाडी १४ तारखेला रस्त्यावर उतरेल आणि माझे कुंकू, माझा देश असे आंदोलन केले जाईल. महिला सिंदूर गोळा करून मोदींना पाठवतील, असं राऊत यांनी सांगितलं आहे. आम्ही बाळासाहेबांचे विचार सोडले, असा आरोप केला जातो. पण आम्ही त्या विचारांपासून दूर गेलो नाहीत, म्हणून आम्ही भारत-पाक सामन्याला विरोध करत आहोत. पण एकनाथ शिंदे काय करत आहेत? ज्यांनी एकेकाळी मैदान उखडलं ते सुद्धा शिंदे गटात आहेत, असा टोला राऊत यांनी लगावला. तसंच भारत पाकिस्तान मॅचच्या दरम्यान मोठे गॅम्बलिंग हे राजस्थान आणि



उत्तरेतल्या राज्यात होत आहे , असा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या भेटीवरही संजय राऊतांनी भाष्य केलं आहे. वृत्तपत्रातल्या बातम्यांवर विश्वास ठेवू नका. वृत्तपत्रातल्या बातम्या या खोट्या आहेत. मी, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे आतमध्ये होतो तिथे दुसरं कोणीही नव्हतं. तर मग आत काय झालं हे कोणाला माहीत आहे का? भेटीत काय चर्चा झाली, याबाबत खोट्या बातम्या वृत्तपत्रात आल्या आहेत, असा दावाही राऊत यांनी केला आहे.

## भुमराळ्यात शेतातील मिरची रोपे विळ्याने कापून फेकली!

**जनसंचलन/ लोणार**

लोणार तालुक्यातील भुमराळा येथील शेतकरी संतोष डिगांबर भोसले यांच्या गट नं. १०१ मधील १२ गुंठे शेतीत मिरची लागवड करण्यात आली होती. मात्र, ८ सप्टेंबरच्या रात्री अज्ञात व्यक्तीने त्यांच्या शेतातील सुमारे ६५० मिरचीची रोपे विळ्याच्या साहाय्याने जमिनीपासून चार इंच वर कापून टाकली. त्यामुळे शेतकऱ्याचे सुमारे चार लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. सकाळी भोसले यांचा मुलगा नेहमीप्रमाणे शेतात गेला असता, संपूर्ण झाडे कापलेली दिसून आली. याबाबतची माहिती बिबी पोलिस स्टेशनला देण्यात आली. माहिती मिळताच ठाणेदार संदीप पाटील, पीएसआय परमेश्वर शिंदे, रवी बोरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. या शेतात दररोज १८ मजूर काम करत होते. झाडे कापून टाकल्यामुळे त्यांचाही रोजगार गेल्याची खंत संतोष भोसले यांनी व्यक्त केली. हा प्रकार पूर्ववैमनस्यातून घडला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. जिल्ह्यात यापूर्वी सोयाबीनच्या सुड्या जाळल्या जात होत्या. आता मिरचीवर ही संक्रांत आली आहे




# ...नेपाळमधील उद्रेक...

## संपादकीय लेख

नेतृत्वहीन असलेल्या संतप्त जमावाने सत्तेची प्रतीके असलेल्या वास्तूंवर हल्ला करून सत्ताधाऱ्यांना खाली खेचण्याचा प्रकार भारतीय उपखंडासाठी आता नवीन राहिलेला नाही. श्रीलंका आणि बांगलादेश यांच्यानंतर नेपाळमध्येही याची पुनरावृत्ती घडली असून, ङ्जेन झीफ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या १३ ते २८ वर्षे या वयोगटातील, प्रामुख्याने शाळा-महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर तेथील पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना अखेर राजीनामा द्यावा लागला. ओली यांनी समाजमाध्यमांवर घातलेल्या निर्बंधानंतर तेथील ङ्जेन झीफ राजधानी काठमांडूसह विविध शहरांत रस्त्यावर उतरली होती. जनतेच्या पैशावर मोठ्या झालेल्या राजकीय नेत्यांची मुले-मुली देशात आणि परदेशांत करीत असलेल्या अय्याशीवर, त्यांच्या महागड्या जीवनशैलीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून, या ङ्जेन झीफने व्यापक भ्रष्टाचाराचा मुद्दा समाजमाध्यमावर उपस्थित केला होता. भ्रष्टाचार आणि बेरोजगारी यांमुळे आधीच प्रक्षुब्ध असलेल्या ङ्जेन झीफमधील असंतोष सरकारच्या निर्णयामुळे आणखी वाढला आणि सोमवारी ते सरकारच्या विरोधात मोठ्या संख्येने रस्त्यावर आले. तरुणाईचे आंदोलन इतके तीव्र होईल याची कल्पना नसलेल्या सरकारने मग त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी हिंसक मार्गाचा अवलंब केला. नि:शस्त्र तरुणाईवर पोलिसांनी गोळीबार केला. अनेकांच्या छातीत किंवा डोक्यात गोळ्या लागल्या. त्यामध्ये १९ जणांचे प्राण गेले. या पोलिस कारवाईतून नेपाळ सरकारची संवेदनशून्यता व बेफिकिरी समोर आली आणि आंदोलनाने हिंसक वळण घेतले. परिस्थिती नियंत्रणाच्या बाहेर जाऊ लागताच ओली यांना पायउतार होण्याखेरीज पर्याय नव्हता. ओली यांच्या राजीनाम्याने ङ्जेन झीफमधील असंतोष काहीसा कमी होईल; परंतु ते उपस्थित करीत असलेले प्रश्न सुटणार नाहीत. दीर्घ काळानंतर राजेशाहीऐवजी लोकशाही स्वीकारलेला नेपाळ भ्रष्टाचाराने पुरता पोखरलेला आहे. तेथील राजकीय नेत्यांची विश्वासार्हता संपुष्टात आली आहे. सत्तेवर कोणीही असले, तरी ते भ्रष्ट मार्गाचाच अवलंब करतात, अशी भावना तेथील जनतेत आहे. हिमालयाच्या कुशीतील या देशात गेल्या काही वर्षांपासून बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. गेल्या वर्षी ती १२.६ टक्के होती. तेथील श्रीमंत म्हणजे राजकीय नेते, नोकरशाही आणि अन्य उच्चभ्रू यांची मुले अमेरिका वा युरोपीय देशांत शिक्षणासाठी जातात, तर बेरोजगार तरुण बांधकाम उद्योग वा शेतीत हंगामी कामे करण्यासाठी भारतात येतात. गेल्या काही वर्षांत आखाती देश , चीन, आग्नेय आशियाई देश यांमध्येही रोजगाराच्या शोधात जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. गेल्या वर्षी तब्बल साडेसात लाख लोक नेपाळमधून रोजगारासाठी बाहेर पडले. परदेशातील नेपाळींनी मायदेशी पाठविलेल्या पैशांवर जगणाऱ्यांची संख्या



मोठी आहे. २०२४मध्ये परदेशातील नेपाळींनी आपल्या नातेवाइकांना एकत्रितपणे ११ अब्ज डॉलर पाठविले होते. नेपाळच्या एकूण अर्थव्यवस्थेच्या २६ टक्के रक्कम ही अशा प्रकारे बाहेरून येणारी आहे. दुसरीकडे देशात रोजगार निर्मितीसाठी फारसे प्रयत्न झालेले नाहीत. भ्रष्टाचार मात्र वाढतो आहे. विमानतळ उभारण्यापासून विमाने खरेदी करण्यापर्यंत आणि जमिनी खरेदी करण्यापासून रस्ते बांधण्यापर्यंत सर्व स्तरांवर भ्रष्टाचार होत असून, त्यात राजकीय नेत्यांची नावे येऊनही त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याचे तेथील जनतेला दिसत होते. त्यामुळे तरुणाईत असंतोष खदखदत होता. ङ्नेपो बेबीजफच्या ऐशआरामामुळे त्याला समाज माध्यमातून वाट मिळाली आणि सरकार अस्वस्थ झाले. जनभावना समजून न घेता सरकारने कृती केली आणि त्यात त्याचाच अंत झाला. नेपाळमध्ये आजही राजेशाहीबद्दल भरभरून बोलणारा एक वर्ग आहे. अधूनमधून तिथे राजेशाही परत आणण्याची मागणीही होत असते. मार्च महिन्यातच तिथे याबाबत आंदोलन झाले होते. राजेशाहीबद्दलची ही अनुकूलता प्रामुख्याने लोकशाही राबविण्याच्या अपयशातून निर्माण झाली आहे. नेपाळला स्थिर सरकार फारसे लाभलेले नाही. मात्र, तेच ते नेते सत्तेवर येताना दिसतात. गेल्या दहा वर्षांत तर ओली, पुष्पकमल दहल ङ्प्रचंडफ आणि शेरबहादूर देऊबा हे आळीपाळीने पंतप्रधान झाले आहेत. हे तिघेही चार-पाच वेळा पंतप्रधान झाले; परंतु त्यांना सुव्यवस्था निर्माण करता आली नाही. त्यांच्यावर, तसेच आधीच्या पंतप्रधानांवरही भ्रष्टाचाराचे आरोप होते. या साऱ्यांमुळे झालेला उद्रेक म्हणजे ङ्जेन झीफचे आंदोलन. ते थांबविण्यासाठी नेपाळी नेत्यांना जनतेचा विश्वास संपादन करावा लागेल. तोपर्यंत तेथील अस्थिरता कायम राहील.

# विधानसभेच्या आश्वासन समितीच्या अध्यक्षपदी आमदार रवी राणा यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे संमतीने नियुक्ती.

## आ. रवी राणा या समितीचे माध्यमातुन राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यावर नियंत्रण ठेवनार. राज्याला पुढे नेण्यासाठी निर्णयाची अंमलबजावणी करून जनतेला विधीमंडळाचे माध्यमातुन न्याय मिळवुन देणार

**जनसंचलन/बुलढाणा**

विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्या संमतीने सतत चौथ्यांदा विधानसभा सदस्य म्हणून विजयी झालेले आमदार रवी राणा यांची नियुक्ती महाराष्ट्र विधानसभा, विधीमंडळाच्या आश्वासन समितीच्या अध्यक्ष पदी झाली. ते ह्या समितीच्या माध्यमातून राज्यातील जनतेला न्याय मिळवून देतील. या समितीच्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नाविषयी सभागृहात मंत्री , राज्यमंत्री, राज्यातील मंत्रालयीन मुख्य सचिव, अमूस, प्रधान सचिव, सचिव, व क्लास वन, ते कनिष्ठ अधिकाऱ्याचे समन्वयातून मंत्री आश्वासन देत असतात,दिले जाते त्याची पूर्तता, अंमलबजावणी करणे या समितीचे अधिकार व कार्य, आहे. या संबंधाने मंत्रालयीन अप्पर मुख्य सचिव , सचिव व अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यासाठी या समितीचे अध्यक्ष त्यांना बोलावत असतात त्यांची साक्ष घेण्यासाठी त्यांना उपस्थित ठेवतात या समन्वयाने आश्वासन पूर्ती होत असते. अश्या पद्धतीने अध्यक्ष आश्वासन त्याची अंमलबजावणी व पूर्तता करत असतात.राज्यातील संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावण्याचे अधिकार अध्यक्ष यांना असतात समितीचे अधिकारातून ते कार्य करत असतात. या अनुषंगाने आमदार रवी राणा आता पूर्ण राज्यावर या समितीच्या माध्यमातून राज्यातील अधिकाऱ्यांवर सनदी अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवणार आहे. राज्याला पुढे नेण्यासाठी निर्णयाची अंमलबजावणी करणार व जनतेची जास्त जोमाने सेवा करणार अशी राज्यात राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.



*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# अगरबत्ती व्यवसाय

अगरबत्ती नवण्याचा व्यवसाय हा खूपच फायदेशीर लघू उद्योग आहे. घरामध्ये कोणताही धार्मिक प्रसंग असला की कापूर, उदत्ती, निरांजन यांना अपार महत्त्व असते. अगदी रोजच्या देवपूजेच्या वेळीही उदबत्तीच्या सुवासाने, घरात पावित्र्याचं आणि मंगल्याचं वातावरण निर्माण होतं. गरीब असो की श्रीमंत, उच्च असो की नीच, प्रत्येकालाच उदबत्तीची माहिती आहे. त्यामुळे उदबत्तीची मागणी कधीही न संपणारी असल्यामुळे एक लघू उद्योग म्हणून अगरबत्ती दररोज विकसित होत असलेला उद्योग आहे.

अगरबत्ती उद्योगासाठी लागणारा कच्चा ाल कोणत्याही स्थानिक ाजारपेठेतून वर्षभर स्वस्त किमतीत उपलब्ध होत असतो. या उद्योगासाठी सुवासिक लाकूड, मुळ्या, साली, पाने, चंदन, अगरू, कोळसा, लवंग, दालाचिनी, निलगिरी, गुला, मोगरा, चमेली, रातराणी अर्क, धूप, कापूर, केवडा, कंकोळ, तुळस, अटामसी, मारवा, नागरमोथा, ुक्का, भाताचे तूस, व्हाईट ऑईल, ग्रीस, लुबिकेटिंग ऑईल, सोरा डिंक, गोंद-खळ, स्टार्च बांबू किंवा वेळूच्या कामट्या आदी कच्चा माल अगरत्ती तयार करण्यासाठी लागतो. महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ राज्यांसह विविध ठिकाणी अगरबत्ती लघू उद्योगाची निर्ति होत आहे. या उद्योगासाठी साधारण ७० ते ८० हजार रुपयांपर्यंत खर्च येऊ शकतो. उद्योग सुरू केल्यानंतर खर्च की- अधिक होऊ शकतो. या उद्योगासाठी ँक आपली योग्य पत पाहून कर्ज पुरवठा करते. हा लघू उद्योग केल्यामुळे आपला अधिक फ्फायदा होऊ शकतो. अगरत्ती उत्पादन व्यवसाय ाजाराची व्याप्ती भारताच्या आत मोठी बाजारपेठ आहे, कारण अनेक समुदाय भारताच्या आत राहतात आणि अगरत्तीचा वापर सर्व धाकि आणि सामाजिक कार्यांध्ये केला जातो आणि अगरबत्ती बनवण्याचा व्यवसाय हा एक व्यवसाय आहे, ज्याध्ये लोकांचा विश्वास आणि भावना असतात, ज्यामुळे हा व्यवसाय कधीही कमी होणार नाही.

केवळ भारतीयच नव्हे, तर अनेक देशांध्ये अगरबत्ती वापरल्या जातात. जसे की लंडन, मलेशिया, नेपाळ, भूतान, वी, ॉरिशस, श्रीलंका इत्यादी परदेशातही अगरबत्तीचा वापर केला जातो, त्यामुळे अगरबत्ती नवण्याचा व्यवसाय हा अखंड व्यवसाय आहे. तुम्ही १३००० रुपये खर्च करून हा व्यवसाय घरीच तयार करून सुरू करू शकता; परंतु जर तुम्ही मशीनवर बसून उदत्तीचा व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल, तर ते सुरू करण्यासाठी सुमारे ५ लाख रुपये खर्च येतील. मॅन्युअल मशीनची किंमत १४ हजार रुपयांपर्यंत, सेमी ऑटोंटिक शीनची किंमत ९० हजार रुपयांपर्यंत आहे. हायस्पीड मशीनची किंमत सुम रे १.१५ लाख रुपये आहे. मॅन्युअल मशीन चालवणे खूप सोपे आहे, ते डबल आणि सिंगल पेडल दोन्ही प्रकारचे आहे. त्याची किंमत देखील कमी आहे, तसेच ती टिकाऊ आणि उत्त दर्जाची आहे. अशा अगरबत्ती नवणा-्या मॅन्युअल मशीनच्या मदतीने उत्पादन चांगल्या दर्जासह सुधारता येते. जर तुम्हाला अगरत्तीचा मोठा व्यवसाय करायचा असेल, तर स्वयंचलित मशीन तुमच्यासाठी अधिक उत्पादन ळिवण्यासाठी योग्य पर्याय असेल. हे मशीन तुच्या गरजेनुसार ाजारात उपलब्ध नमुन्यांची, डिझाइन्स आणि आकारांच्या चांगल्या प्रकारात येते. स्वयंचलित मशीनचा फ्फायदा म्हणजे या मशीनद्वारे १५० ते १८० उदत्ती एका मिनिटात तयार करता येतात. या शीनध्ये सरळ, गोल आणि चौरस प्रकारच्या काड्या उदबत्तीसाठी वापरता येतात. हायस्पीड शीन या प्रकारच्या मशीनध्ये तुम्हाला की कामगारांची आवश्यकता असेल. हे पूर्णपणे स्वयंचलित मशीन आहे. याचा वापर करून किमान वेतन खर्चात जास्त उत्पादन मिळवता येते. या मशीनद्वारे एका ंनिटात ३०० ते ४५० उदबत्त्या तयार करता येतात. या शीनध्ये अगरबत्तीची लांबी ८ ते १२ इंच ठेवता येते.

सूक्ष्, लघू आणि मध्य उद्योग ंत्रालयाच्या वतीने अगरबत्ती तयार करणा-्या कारागिरांना विविध स्तरावर पाठळ देऊन या उद्योगाच्या विस्तारासाठी आणि उदत्ती निर्ति क्षेत्रात देशाला आतनिर्भर नविण्याच्या हेतूने ४ सप्टेंबर २०२० रोजी नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत. यामुळे अगरत्ती निर्ति व्यवसायाला मोठ्या प्रमाणावर मदत मिळू शकणार आहे.

अगरबत्ती नविण्यासाठी स्वयंचलित यंत्राचा पुरवठा करण्यात येणार आहे. अगरत्ती नविण्यासाठी लागणारा कच्चा माल नियमित पुरविणे सुनिश्चित करण्यात येणार आहे. अगरत्ती निर्मितीसाठी आधी २०० स्वयंचलित यंत्रांचा पुरवठा करण्यात आला होता. आता ४०० यंत्रे संधित संस्थांना देण्यात येणार आहेत. तसेच सायकलप्रमाणे पायाने चालविता येणारी अतिरिक्त ५०० यंत्रे स्वमदत समूहांना देण्यात येणार आहेत. अगरत्ती निर्मिती क्षेत्रामध्ये देशाला आतनिर्भर बनविण्यासाठी देशभराध्ये २० पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये अगरबत्ती निर्तिसाठी लागणा-्या कच्च्या मालाची पुरवठा साखळी तयार करणे तसेच नलेल्या मालाचे व्यावसायिक पद्धतीने विपणन करणे, यांचा समावेश आहे. सरकारने अगरत्ती कारागीर विकास कार्यक्रमाला व्यापक स्वरूप दिले असून यासाठी सरकार आता ५५ कोटींपेक्षा जास्त खर्च करणार आहे. मंत्रालयाच्या पारंपरिक उद्योगांच्या पुनर्रचनेसाठी स्फूर्तीफ या योजनेच्या अंतर्गत देशाध्ये अगरबत्ती निर्ति उद्योगासाठी १० केंद्रे उभारण्यात येणार आहेत. यासाठी ५० कोटी सरकार खर्च करणार आहे. त्याचा लाभ देशातल्या सुमारे ५००० अगरबत्ती कारागिरांना होणार आहे. या क्षेत्राध्ये खादी आणि कुटिरोद्योग आयोगाच्या वतीने हाताने अगरबत्ती करणा-्या आणि स्वमदत समूहांधल्या कारागिरांना मदत करण्यात येणार आहे. अगरबत्ती कारागिरांना प्रशिक्षण, कच्चा माल, विपणन यासाठी मदत करणे आणि सातत्याने पाठिं देणे. अगरत्ती उत्पादनाच्या सर्व ाबींवर कार्य करणे. यामध्ये सुगंधासाठी नावीन्यपूर्ण कल्पना राध्ये सुगंधासाठी नावीन्यपूर्ण कल्पना राबविताना पर्यायी कच्च्या ालाच्या फ्फेरवापराचा विचार करणे. वाहिलेल्या फ्फुलांचा वापर करणे, काथ्याचा वापर, त्याचबरोबर कृषी मंत्रालयाच्या मदतीने बांबूच्या काड्या उपलब्ध करून देण्यासाठी का करण्यात येत आहे. कन्नौज हे सुगंधाचे केंद्र स्थान आहे, हे लक्षात घेऊन अगरबत्ती निर्तिध्ये वेगवेगळे गंध विकसित करण्यासाठी कन्नौज येथे एक उत्कृष्ठता केंद्रफ स्थापन करण्यात येत आहे. या कार्यक्रामुळे जवळपास १५०० कारागिरांना ताबडतोब लाभ मिळणार आहे. त्यांना उत्पन्नाचे शाश्वत साधन उपलब्ध होणार आहे. यासाठी जे स्थलांतरित कामगार आहेत आणि हाताने अगरबत्ती तयार करण्याचे का सध्या करीत आहेत, त्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे.



# रात्री दिसणारं हे लक्षण ब्लड कॅन्सरचा मोठा संकेत, दुर्लक्ष केलं तर जीवाला धोका, शरीरात हे ६ बदल दिसताच सावधान

दररोजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत आपल्याला शरीरात घडणाऱ्या सूक्ष्म बदलांची दखल घेण्यास वेळच मिळत नाही. लहानसहान त्रासांना आपण नेहमीसारखेच समजून टाळतो. मात्र याच साध्या लक्षणांमागे गंभीर आजार दडलेला असतो, हे आपल्याला उशिरा कळते. काही वेळा शरीर आपल्याला इशारे देत असते, पण ते आपण वेळीच ओळखले नाही तर परिस्थिती हाताबाहेर जाते.

जगभरात असे अनेक आजार आहेत जे हळूहळू पसरत जातात आणि एकदा लक्षात आले की ते मोठ्या संकटात परिवर्तित झालेले असतात.अशाच एका आजाराबद्दल दरवर्षी विशेष जागरूकता मोहीम राबवली जाते. यात उद्दिष्ट असते लोकांना वेळेआधी सावध करणे, जेणेकरून छोट्या-छोट्या चिन्हांवरूनही जीव वाचवला जाऊ शकतो. आज आपण त्या आजाराची काही सुरुवातीची चिन्हे जाणून घेणार आहोत, ज्यांची वेळेत दखल घेतली तर उपचार सोपे ठरू शकतात.

### अचानक येणारा रात्रीचा घाम आणि ताप

कधीकधी रात्री झोपेत अनपेक्षितपणे प्रचंड घाम फुटतो किंवा वारंवार ताप येतो. हे केवळ हवामान बदलाचे लक्षण नसून गंभीर आजाराचे इशारे असू शकतात. विशेषत: हॉजकिन



आणि नॉन-हॉजकिन लिम्फोमा तसेच ल्यूकेमियामध्ये असे बदल दिसू शकतात.

अनेकदा लोक हे साधे तापमान बदल किंवा थकव्यामुळे झालेला घाम समजून दुर्लक्ष करतात. परंतु ही लक्षणे वारंवार जाणवू लागली तर तातडीने वैद्यकीय सल्ला घेणे गरजेचे ठरते. वेळेत निदान झाले तर उपचार करणे सोपे ठरते आणि जीवघेणा धोका टाळता येतो.

### अकस्मात वजन घटणे आणि भूक मंदावणे

शरीराचे वज न कमी होण्यासाठी साधारणपणे डाएटिंग, व्यायाम किंवा ताणतणाव कारणीभूत असतात. मात्र यापैकी काहीही नसताना वजन झपाट्याने घटत असेल, तर हे साधारण नाही. काही आठवड्यांत किंवा महिन्यांत अचानक झालेले वजन कमी होणे हे शरीरात घडणाऱ्या गंभीर बदलांचे चिन्ह असते. यासोबतच जर भूकही सतत कमी जाणवत असेल, जेवणाची इच्छा होत नसेल, तर लिम्फोमासारख्या आजाराची ही सुरुवातीची चिन्हे असू शकतात. अशा वेळी तज्ज्ञांचा सल्ला घेणे टाळू नये.

### निरर्थक थकवा आणि श्वास घेण्यास त्रास

व्यायाम किंवा शारीरिक मेहनतीनंतर थकवा येणे स्वाभाविक आहे. पण कोणत्याही कारणाशिवाय दिवसभर थकल्यासारखे वाटणे, अंगात शक्तीच उरली नाही असे जाणवणे, थोडे चालताच श्वास लागणे ही चिंतेची लक्षणे आहेत. ल्यूकेमियामध्ये रक्तनिर्मितीवर परिणाम होत असल्याने शरीरात हिमोग्लोबिन कमी होते आणि त्यामुळे एनीमिया वाढतो. परिणामी सतत थकवा, त्वचा पांढरट होणे, थोड्याशा कामानंतर श्वास फुलणे असे बदल दिसतात. या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये.

# नागपुरात खळबळजनक घटना! अज्ञातांनी व्यापाऱ्याला भररस्त्यात घेरत गोळ्या झाडल्या, नेमकं काय घडलं?

**नागपूर :** नागपूर शहरातील जरिपटका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कडबी चौकाजवळ बुधवारी संध्याकाळी घडलेल्या एका थरारक घटनेने नागपूर हादरले आहे. किराणा व्यापारी आणि हवाला व्यवसायाशी संबंधित असलेल्याची माहिती असलेल्या राजू रूपचंद दीपानी यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडत लाखो रुपयांची रोकड लुटून पळून गेले. मिळालेल्या माहितीनुसार, दीपानी हे मेंकोसाबाग परिसरात राहतात. कडबी चौकाजवळ त्यांच्या कारवर चार अज्ञात व्यक्तींनी फायरिंग केले. राजू दीपानी हे कामकाजानिमित्त मोठ्या रकमेची रोकड घेऊन जात असताना आधीच दबा धरून बसलेल्या दोन




मुखवटेधारी आरोपींनी त्यांना रोखले. त्याचवेळी दोन आरोपी दुचाकीवरून त्यांचा पाठलाग करत मागे आले. त्यानंतर आरोपींनी अचानक राजू दीपानी यांच्यावर हल्ला करत तीन राऊंड फायर केले. यामध्ये एक गोळी त्यांच्या हाताला व दोन गोळ्या पाठीवर लागल्या. दरम्यान घटनास्थळी क्षणभर दहशत पसरली. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी धाव घेऊन त्यांना जखमी झालेल्या दीपानींना तातडीने मॅक्स रुग्णालयात दाखल करण्यात आले असून जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.या लुटीत आरोपींनी दीपानींकडील नेमकी किती रक्कम लुटली गेली, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. असे असले तरी आरोपींनी दीपानी यांच्याकडील तब्बल ५० लाखांची रक्कम लुटली असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांनी मात्र अधिकृत आकडेवारी जाहीर केलेली नाही. मात्र व्यवहाराचा हवाला व्यवसायाशी संबंध असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.घटनेची माहिती मिळताच पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. गुन्हे शाखेसह जरिपटका पोलीस ठाण्याचे पथक तपास करत आहे. प्राथमिक चौकशीत ही रोकड हवाला व्यवहाराशी संबंधित असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. योजनाबद्ध पद्धतीने केलेल्या या हल्ल्यामागे गुन्हेगारी टोळींचा हात असावा, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. दरम्यान, पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध खुनाचा प्रयत्न, लूटमार आणि शस्त्रास्त्र बाळगल्याप्रकरणी गंभीर गुन्हा नोंदवला असून घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# लाडक्या बहिणींना ऑगस्ट महिन्याचे पैसे कधी मिळणार?

## हफ्त्याच्या वितरणासंदर्भात मोठी अपडेट समोर



**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ऑगस्ट महिन्याच्या हप्त्याची लाभार्थी महिला अद्यापपर्यंत वाट बघत आहेत. आतापर्यंत लाडक्या बहिणींना एकूण १३ हप्त्यांचे पैसे मिळाले आहेत. त्याचदरम्यान, ऑगस्ट महिन्याच्या हप्त्याच्या वितरणासंदर्भात नवी अपडेट समोर आली आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक न्याय विभागाने ऑगस्ट महिन्याच्या आर्थिक लाभाच्या वितरणासाठी ३४४.३० कोटी रुपयांचा निधी महिला व बालविकास विभागाला देण्यासंदर्भातील शासन निर्णय काल ९ सप्टेंबरला जारी करण्यात आला आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ऑगस्ट महिन्याच्या आर्थिक लाभाच्या वितरणासाठी ३४४.३० कोटी रुपयांचा निधी महिला व बाल विकास विभागाला देण्यासाठी मान्यता देण्यात येत असल्याचे शासन निर्णयात म्हटले आहे. महायुती सरकारने २०२४च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी माझी लाडकी बहीण योजना सुरु केली होती. ही योजना महायुती सरकारला पुन्हा सत्तेत आणण्यासाठी गेमचेंचर ठरली. लाडकी बहीण योजनेच्या शासन निर्णयानुसार लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये दिले जातात. तर, पीएम किसान सन्मान निधी आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या लाभार्थी शेतकरी महिलांना दरमहा ५०० रुपये दिले जातात. ही योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत १३ हप्ते पात्र महिलांच्या खात्यात टाकण्यात आले आहेत. लाडकी बहीण योजनेच्या लाभाचे वितरण करण्यासाठी सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभागाकडून महिला व बाल विकास विभागाला रक्कम देण्यात येते. त्याप्रमाणेच सामाजिक न्याय विभागाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या हफ्ते वितरणासाठी ३४४.३० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. त्यामुळे आता लवकरच राज्य सरकारकडून किंवा महिला व बाल विकास विभागाकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ऑगस्टच्या हफ्ता वितरणाची तारीख आणि सविस्तर माहिती मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे.दरम्यान, एकीकडे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ऑगस्ट महिन्याची प्रतीक्षा लाडक्या बहिणी करत असल्या तरी दुसरीकडे महिला व बाल विकास विभागाकडून माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे २६ लाख महिलांची चौकशी केली जाणार आहे.

### शिक्षिकेने ओढणी...

कोथिंबीरेच्या माध्यमातून शिक्षिकेकडे वीस हजारांची लाच मागितली. लाच देण्याची इच्छा नसल्याने शिक्षिकेने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली.एसीबीने ठरल्यानुसार सापळा रचला. ठरल्यानुसार शिक्षक महिलेने ऑपरेटर कोथिंबीरे याच्याकडे मुख्याध्यापक भावले यांच्या सांगण्यावरून वीस हजार रुपये दिले. एसीबीने सांगितल्यानुसार पैसे देताच महिला शिक्षकांनी ओढणी झटकून पथकाला इशारा दिला. याच वेळी पथकाने तात्काळ ताब्यात घेऊन दोघांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून २० हजार रुपयाची लाचेची रक्कम दोन मोबाईल जप्त करण्यात आली आहे.ही कारवाई अधीक्षक माधुरी कांगणे, उपाधीक्षक संगीता पाटील यांच्या पथकातील जमादार सचिन बारसे यांनी केली. या प्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# घरगुती वादातून रक्तरंजित थरार, रागाच्या भरात झालेल्या हल्ल्याने जावई ठार; घटनेनं खळबळ...

**अकोला :** रागाच्या भरात कोणती घटना घडेल याचा नेम काही लागू शकत नाही. अकोल्यातील पातूर तालुक्याच्या अंबाशी गावातही असाच प्रकार समोर आला आहे. घरगुती वादातून जावयाचा खून झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. नागेश गोपणारायन असे मृतकाचे नाव आहे.अकोला जिल्ह्याच्या पातुर तालुक्यातील अंबाशी येथे घरगुती वादातून एकाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अंबाशी येथील रहिवासी छाया हिवराळे हिचा विवाह अकोला तालुक्यातील कानशिवणी येथील नागेश गोपनारायण यांच्याशी झाला होता. सध्या नागेश असोला फाटा येथे वास्तव्यास होता. तो सासरवाडीत अंबाशी येथे आला असताना काही कारणावरून सासरवाडीच्या लोकांसोबत घरगुती वाद झाला होता.शाब्दिक वादाचे रुपांतर हाणामारीत झाले आणि रागाच्या भरात नागेश याच्यावर काठ्यांनी आणि कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला चढवला.

या हल्ल्यात नागेश गंभीर जखमी झाला, यातच त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पातुर पोलीस व चांनी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती घेऊन पंचनामा केला व मृतदेह अकोला येथील सर्वोच्च रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला असून, याप्रकरणी दोन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे. यातील आणखी काही आरोपी आहेत का? हा वाद नेमका कशामुळे झाला याचा तपास पोलीस करत आहेत.




या अमानुष वृत्तीच्या घटनेमुळे स्थानिक नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे. या घटनेने एक कुटुंब उध्वस्त केले आहे. एखादा घरगुती वाद कसा जीवघेणा ठरतो यावर नागरिकांमध्ये आपसूकच चर्चा सुरू झाली आहे. याप्रकरणी पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

## दवाखान्यातून परतताना आक्रित घडलं, टिप्परची बुलेटला जोरदार धडक

### बायकोच्या डोळ्यासमोर नवऱ्याचा अन् नातीचा मृत्यू

**बीड :** बीड जिल्ह्याच्या परळी तालुक्यातील पांगरी येथील महामार्गावर टिप्पर आणि बुलेटचा भीषण अपघात झाल्याची घटना नुकतीच घडली आहे. या घटनेत दोघांचा जागीच मृत्यू झाल्याचं समोर आलं आहे, तर एकजण गंभीर जखमी झालं आहे. घटनेची माहिती मिळताच परळी येथील ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस घटनास्थळी दाखल होताच पोलिसांनी जखमी झालेल्या महिलेला अंबाजोगाई येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, यश कंपनीच्या टिप्परने बुलेट गाडीला धडक दिली असल्यानं हा अपघात झाला असल्याचं सांगण्यात येत आहे. हा अपघात जुन्या पांगरी गावामध्ये नागरगोजे यांच्या आखाड्यासमोर घडला असून या अपघातात जळगव्हाणचे सरपंच यांचा जागीच मृत्यू झाल्याचं समोर आलं आहे. जळगव्हाणचे सरपंच वसंत ताराचंद चव्हाण (वय ५५) असं त्यांचं नाव आहे. तर सरपंच वसंत चव्हाण यांची नात श्रुती विजय चव्हाण (वय ८ वर्षे) हिचा देखील जागीच मृत्यू झाला आहे. तर पत्नी कस्तुराबाई वसंत चव्हाण या गंभीर जखमी आहेत.दरम्यान, आजी-आजोबा आपली नात श्रुतीला दुपारी परळी येथील खासगी रुग्णालयात घेऊन गेले होते. तिच्यावर तिथे उपचार झाल्यानंतर गावाकडे परतताना सायंकाळी अपघात घडला असल्याचं सांगण्यात येत आहे. तसेच त्यांच्यासोबत त्यांची नात पण मयत झाल्याचं समोर येत आहे. घटनेचा पंचनामा सुरू असून नेमका अपघात झाला की घातपात झाला? हे पोलिस तपासात समोर येणार आहे.



## एकनाथ शिंदे ॲक्शन मोडवर, बीएमसी निवडणुकीआधी मास्टरप्लॅन, राज-उद्धव ठाकरे यांना भारी पडणार?



**मुंबई :** महाराष्ट्रात आगामी काळात मुंबई महापालिका निवडणुका पार पडणार आहेत. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. ही मुंबई महापालिका निवडणूक दोन्ही शिवसेना, मनसे आणि भाजपसाठी अतिशय प्रतिष्ठेची असणार आहे. लोकसभा निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मुंबईत चांगलं यश मिळालं होतं. तसेच विधानसभा निवडणुकीतही उद्धव ठाकरे यांना चांगलं यश मिळालं होतं. उद्धव ठाकरे यांना उर्वरित महाराष्ट्रात अपेक्षित यश मिळालं नव्हतं. पण मुंबईतून त्यांचे सर्वाधिक आमदार जिंकून आले होते. यामुळे उद्धव ठाकरे यांची मुंबईत ताकद आहे हे स्पष्ट झालं होतं.उद्धव ठाकरे यांची हीच ताकद कमकुवत करण्यासाठी आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना कामाला लागली आहे. कारण आगामी काळात मुंबई महापालिका निवडणुकीत उद्धव ठाकरे यांचा पराभव केला तर शिंदेंसाठी तो फार मोठा विजय असेल. त्यासाठी त्यांनी महत्वाचं पाऊल उचललं आहे.एकनाथ शिंदे यांनी आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी आपल्या शिलेदारांना कामाला लावलं आहे.

या निवडणुकीत सर्वाधिक जागांवर विजय मिळावा यासाठी एकनाथ शिंदे यांनी आपल्या पक्षाच्या नेत्यांना जबाबदारी दिली आहे. यासाठी २१ प्रमुख नेत्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीला मुख्य कार्यकारी समिती असं नाव देण्यात आलं आहे. शिंदेंच्या शिवसेनेकडून २१ प्रमुख नेत्यांची मुख्य कार्यकारी समिती आज जाहीर करण्यात आली आहे. आगामी काळात मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे हे एकत्र येण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे या दोन्ही भावांची युती झाली तर मुंबई महापालिका निवडणुकीत दोन्ही भावांचा एकत्रित सामना करणं हे एकनाथ शिंदे यांना भारी पडू शकतं. विशेष म्हणजे भाजपला देखील मुंबई महापालिकेत सत्ता हवी आहे. यासाठी भाजपकडूनदेखील मोर्चेबांधणी सुरु आहे. शिंदेंची शिवसेना आणि भाजप मित्रपक्ष असले तरी त्यांच्यात एक अघोषित अशी स्पर्धा असणार आहेच. पण त्यापेक्षा जास्त ठाकरे बंधूंचं आव्हान दोन्ही पक्षांना असणार आहे. यामुळे एकनाथ शिंदे आतापासूनच कामाला लागले आहेत.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शाळकरी मुलाने मुलीला स्कूटीवर घरी सोडलं, कुटुंबियांचा राग अनावर

## विद्यार्थ्याला मारहाण करत गोळीबार...




**पुणे :** वडगाव मावळ येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या एका मुलाने एका मुलीला त्याच्या स्कूटीवरून घरी सोडल्याच्या कारणावरून मुलीच्या चौघा नातेवाइकांनी मुलाला मारहाण केली, तर सायंकाळी संबंधित चौघांनी वडगाव येथील एका चौकात मुलाच्या नातेवाइकाच्या दिशेने गोळीबार केला.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. सोमवारी (सात सप्टेंबर) सायंकाळी वडगाव मावळ येथे ही घटना घडली. या प्रकरणी वडगाव मावळ पोलिसांनी तिघांना अटक केली असून, वडगाव मावळ न्यायालयाने त्यांना नऊ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. एक जण फरार आहे.गोविंद विलास मोहिते (वय १६, रा. केशवनगर, वडगाव मावळ) असे मारहाण करण्यात आलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. रणजित बाळासाहेब ओव्हाळ (वय २३), अभिजित राजाराम ओव्हाळ (वय २८, दोघेही रा. सांगवी, वडगाव मावळ), प्रथमेश दिवे (वय २३, रा. तळेगाव दाभाडे) व सौरभ रोहिदास वाघमारे (वय २७, रा. कुरकुंडी, ता. खेड) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी रणजित, अभिजित आणि प्रथमेशला अटक केली असून, त्यांना वडगाव मावळ न्यायालयाने १७ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे, तर सौरभ वाघमारे फरार आहे. अक्षय एकनाथ मोहिते (वय २८, रा. केशवनगर, वडगाव मावळ) याने फिर्याद दाखल केली आहे.वडगाव मावळ येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या मुलाने एका मुलीला त्याच्या स्कूटीवरून घरी सोडले. या कारणावरून मुलीच्या नातेवाइकांनी त्यांच्या दोन मित्रांसह शाळेत जाऊन संबंधित विद्यार्थ्याला मारहाण केली. मुलाचा चुलतभाऊ अक्षय व त्याच्या मित्रांनी विद्यार्थ्याची स्कॉर्पिओमधून सुटका करून त्याला घरी सोडले.त्यानंतर अक्षय व त्याचा मित्र सायंकाळी साडेसहा वाजता केशवनगर येथील एकवीरा चौकात बसले होते. त्या वेळी मुलीच्या नातेवाइकांपैकी दोघांनी त्यांना शिवीगाळ केली. त्यानंतर काही वेळातच दुचाकीवरून आलेल्या अभिजित व सौरभ यांनीही बाचाबाची केली. सौरभने त्याच्याजवळील पिस्तुलातून अक्षयच्या दिशेने गोळी झाडली. मात्र, त्याचा नेम चुकल्याने अक्षयसह त्याच्या मित्राने तेथून पळ काढला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच वडगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तिघांना ताब्यात घेतले. पोलिस निरीक्षक कुमार कदम तपास करीत आहेत.


---

# महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांआधी केंद्रीय निवडणूक आयोगाचं मोठं पाऊल




**नवी दिल्ली :** महाराष्ट्रात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकांसाठी प्रत्येर पक्षाच्या गोटात जोरदार हालचाली सुरु आहेत. प्रत्येक पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मोर्चाबांधणी आखत आहे. याचाच एक भाग म्हणजे वेगवेगळ्या पक्षांमध्ये सध्या जोरदार पक्षप्रवेशाचे कार्यक्रम पार पडत आहेत. प्रत्येक पक्ष स्थानिक पातळीवर आपला पक्ष मजबुत करण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्यासाठी स्थानिक माजी नगरसेवकांना गळाला लावलं जात आहे. स्थानिप पातळीवर संघटना मजबूत करुन निवडणुकांमध्ये यश मिळवण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न आहे. या निवडणुका दिवाळीनंतर पार पडण्याची शक्यता आहे. असं असताना आता एक अतिशय महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर येत आहे.केंद्रीय निवडणूक आयोग महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांआधी बिहारप्रमाणे महाराष्ट्रातही मतदार याद्यांची सखोल फेरतपासणी करण्याच्या तयारीत आहे. केंद्रीय निवडणूक आयोग देशभरात मतदार याद्यांची फेरतपासणी करण्याच्या तयारीत आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची परिषद घेतली आहे. या परिषदेत देशभरातील मतदार याद्यांच्या फेरतपासणीसाठी आयोगाकडून आढावा घेण्यात आला.विशेष म्हणजे बिहारमधील मतदार याद्यांच्या फेरतपासणीवर विरोधकांकडून आक्षेप घेण्यात आला आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी त्यावर गंभीर आरोप केले आहेत. विरोधकांकडून केंद्रीय निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले जात आहेत. तरीही केंद्र सरकारकडून देशभरात मतदार याद्यांची फेरतपासणी करण्यात येत आहे. यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांसोबत महत्त्वाची परिषद घेतली. यामध्ये मतदार याद्यांची फेरतपासणी करण्यासाठी कुठपर्यंत तयारी झाली. तसेच प्रत्यक्ष विशेष मतदारयादी परिक्षण कधी राबवलं जाऊ शकतं, याबाबत माहिती घेण्यात आली.केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यांच्या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या घेतलेल्या या परिषदेत काही महत्त्वाच्या देखील सूचना देण्यात आल्या आहेत. १२०० पेक्षा जास्त मतदार एका मतदार केंद्रावर नसतील याची काळजी घेण्यास सांगण्यात आलं आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महाराष्ट्रात नवे मतदार पोलिंग स्टेशन तयार होऊ शकतात. तसेच महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांधी मतदार याद्यांची फेरतपासणी केली जाऊ शकते, असे संकेत मिळताना दिसत आहेत.

---



# शिक्षिकेने ओढणी झटकत इशारा केला, जिल्हा परिषद शाळेचा मुख्याध्यापक रंगेहाथ सापडला...

**छत्रपती संभाजीनगर :** सातारा परिसरातील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापकाने शिक्षकेला अर्जित रजा मंजूर करण्यासाठी तब्बल २० हजार रुपयांची लाच मागितली. लाच देण्याची इच्छा नसलेल्या शिक्षिकेने एसीबीकडे तक्रार केली. ठरल्याप्रमाणे शिक्षिकेने ओढणी झटकली अन् २० हजार रुपयाची लाच घेताना पंटरसह मुख्याध्यापक रंगेहाथ पकडला. सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्याध्यापक सोमनाथ भागोजी भावले, वय ५२ वर्ष, राहणार वसंत विहार, बीड बायपास, पंटर -शाळेतील संगणक ऑपरेटर गणेश रामनाथ कोथिंबीरे, वय २६ वर्ष, राहणार सातारा गाव, अशी आरोपींची नावे आहेत. दरम्यान या प्रकरणी अधिक माहिती अशी की, तक्रारदार महिलेने मुख्याध्यापक सोमनाथ भावले याच्याकडे अर्जित रजा मंजूर करण्यासाठी अर्ज केला होता. मात्र रजा मंजूर करण्यासाठी भावले यांनी ऑपरेटर (पुढील पानावर)

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भाजपची जिल्ह्याची सेवा पंधरवाडा कार्यशाळा आज

जनसंचलन/बुलढाणा

भारतीय जनता पार्टीच्या वतीने दि. १७ सप्टेंबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून ते २ ऑक्टोंबर महात्मा गांधी जयंती दरम्यान सेवा पंधरवाडा अभियाना राबविण्यात येत आहे. या अभियानाची कार्यशाळा दि. ११सप्टेंबर दुपारी १.०० वाजता गर्दे वाचनालय, बुलढाणा येथे आयोजित करण्यात आले आहे. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक नवनियुक्त सहपालमंत्री ना. संजय सावकारे, प्रदेश उपाध्यक्ष आमदार चैनसुख संचेती, प्रदेश सरचिटणीस रणधीर सावरकर, आ. श्वेता महाले, जिल्हाध्यक्ष माजी आ. विजयराज शिंदे राहणार आहेत. दि. १७ सप्टेंबर २०२५ ते दि. २ ऑटोबर पर्यंत बुलढाणा जिल्ह्यात राबविल्या जाणाऱ्या सेवा पंधरवडा अभियान संदर्भात माहिती देणे व नियोजन करणे. भाजपाची बुलढाणा जिल्हा विस्तारित कार्यकारणी, आघाड्यांची कार्यकारिणी जाहीर करणे. व विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती देणे. या महत्त्वाच्या दोन विषयावर सदर बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. बैठकीला कोणतेही कारण न सांगता सर्वांनी उपस्थित राहावे. जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व जिल्हा कार्यकारणी सदस्य, मंडल अध्यक्ष, मंडळातील सर्व पदाधिकारी, आघाड्यांचे सर्व प्रमुख व पदाधिकारी, सेवा पंधरवडा जिल्हा संयोजक, सह संयोजक (जिल्हा समिती ) सोशल मीडिया प्रतिनिधी,मंडल संयोजक, सहसंयोजक, मंडल सोशल मीडिया प्रतिनिधी, महिला आघाडी, युवा आघाडीचे सर्व पदाधिकारी यांनी बैठकीला उपस्थित राहावे. असे आवाहन जिल्हाध्यक्ष माजी आ. विजयराज शिंदे यांनी केले आहे.

# सह पालकमंत्री ना. संजय सावकारे यांचा जिल्हा दौरा



जनसंचलन/बुलढाणा

राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री तथा जिल्ह्याचे सह पालकमंत्री ना. संजय सावकारे हे आज गुरुवार दि. ११ सप्टेंबर रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या दौऱ्यानुसार ते सकाळी ९.४५ वाजता मलकापूर येथे आगमन. सकाळी १० वाजता मलकापूर येथील ओमकार लॉन, बुलढाणा रोड, निंबाजी फाटा, मलकापूर येथे आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५ या कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १ वाजता बुलढाणा येथे शासकीय विश्रामगृह आगमन व राखीव, यानंतर दुपारी दुपारी २.१५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे विविध विषयांबाबत जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतील. त्यानंतर दुपारी ३.३० वाजता भुसावळकडे प्रयाण करतील.

# नागरिकांच्या तक्रारी,अर्ज, निवेदनांवर तातडीने कार्यवाही करा...

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे अधिकाऱ्यांना आदेश

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारी, अर्ज, निवेदनांवर तातडीने कार्यवाही करा अन्यथा अनुचित प्रकार घडल्यासत्याला कार्यालय प्रमुख जबाबदार राहतील, अशा सक्त सूचनांचे परिपत्रक जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जारी केले आहे. जिल्ह्यातील नागरिक, सामाजिक संस्था त्यांच्या मागणींच्या अनुषंगाने संबंधित विभागाकडे निवेदने किंवा विनंती अर्ज सादर करतात. तसचे इतर विभागांच्या मागणी संदर्भात सुध्दा अर्जदार जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज सादर करतात. यामध्ये प्रामुख्याने घरकुल, अतिक्रमण, शेतीचा वाद, शेतरस्ता, शेती मोजणी, पाणंद रस्ता, भुसंपादन मोबदला, वन जमीनी, पाणी पुरवठा, रस्ते, पुल, विकास कामे, विद्युत पुरवठा इत्यादीबाबत अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाद्वारा उचित कार्यवाहीसाठी संबंधित विभागास पाठविण्यात येतात. परंतू सदर अर्ज व निवेदनांवर कार्यवाही न झाल्यामुळे व बऱ्याच कालावधीपासून मागणी प्रलंबित राहत असल्यामुळे अर्जदार उपोषण किंवा आत्मदहनाचा मार्ग अवलंबितात. संबंधित कार्यालय वेळची अर्जदाराच्या मागणीची दखल घेत नसल्याचे निर्दशनास येत आहे. पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांनीही निदर्शनास आणून दिले आहे की, अर्जदाराचे मागणीवर अथवा अर्जावर प्रदिर्घ कालावधी होवून सुध्दा त्यांचे अर्जावर कारवाई केली जात नाही. सन २०२५ मध्ये अनेक निवेदनकर्ते यांच्या मागणी संदर्भात संबंधित विभागाकडून वेळीच दखल न घेतल्याने आत्मदहन, उपोषण, आंदोलने इत्यादी प्रकरणे नोंद झाली असून या प्रकरणांमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच मोबाईल टॉवरवर चढण्याच्या घटनामध्येही वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगांने उपाययोजना करण्यासाठी जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी परिपत्रक जारी करुन जिल्ह्यातील सर्व शासकीय, निशासकीय कार्यालय प्रमुख यांना आदेशीत केले की, आपले कार्यालयास प्राप्त निवेदन व अर्ज तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पाठविण्यात येणारे अर्ज व निवेदने यावर तातडीने कार्यवाही करुन अर्जदारास केलेल्या कार्यवाहीबाबत अवगत करावे. नागरिकांच्या समस्यांचे निवारण करण्यात यावे. अर्जदारास संबंधित प्रकरणातील वस्तुस्थिती निर्दशनास आणून देण्यात यावी. अर्जदारास उपोषण, आत्मदहन, जलसमाधी पासून परावृत्त करण्यात यावे. ज्या कार्यालयाशी संबंधित उपोषण किंवा आत्मदहन असेल अशा प्रकरणामध्ये संबंधित कार्यालय प्रमुखांनी उपोषण स्थळास भेट देवून अर्जदाराचे म्हणणे विचारात घेवून तातडीने त्या प्रकरणात




निर्णय घ्यावा. संबंधित कार्यालय प्रमुख यांनी कार्यवाही न केल्यामुळे उपोषण, आत्मदहन, जलसमाधी यासारख्या प्रकरणामध्ये तानतणाव निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न होणार नाही याची दक्षता घ्यावी. याउपरही संबंधित कार्यालयाने तातडीने कार्यवाही न केल्यास व त्यातून अनुचित प्रकार घडल्यास त्यास संबंधित कार्यालय प्रमुख जबाबदार राहतील, याची गांर्भीयाने नोंद घ्यावी, असे परिपत्रकात नमूद करण्याचे आले आहे. तसेच निवेदनकर्ते टॉवर किंवा पाण्याची टाकी यावर चढून आंदोलन करणार नाहीत, याकरीता सर्व तहसिलदार यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील टॉवर कंपनीस तातडीने टॉवरच्या सभोवताली प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत सुचित करावे. निवेदनकर्ते व उपोषणकर्ते यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी जिल्हा शल्यचिकित्सक, बुलढाणा यांनी वैद्यकीय अधिकारी नेमून वेळोवेळी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी परिपत्रकाद्वारे दिले आहे.

# सावळी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यशाळा

## चिखली मतदारसंघाला पारितोषिक मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू आमदार श्वेता ताई महाले

जनसंचलन/ चिखली



ग्रामीण विकासाची नवी दिशा ठरवणारे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय कार्यशाळा आज चिखली मतदारसंघातील सावळी (ता. बुलढाणा) येथे संपन्न झाली. या अभियानाविषयी सविस्तर माहिती देताना आमदार श्वेता ताई महाले म्हणाल्या, या अभियानाचा उद्देश प्रत्येक ग्रामपंचायतीला सक्षम, पारदर्शक आणि विकासाभिमुख करणे आहे. यातून गावागावात शाश्वत विकास घडवून आणण्याची ताकद ग्रामपंचायतींना मिळेल. पाणी, वीज, रस्ते, शाळा, अंगणवाडी, महिला बचत भवन, ग्रामस्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधा या अभियानाद्वारे अधिक प्रभावीपणे उपलब्ध होतील.फ्फ चिखली मतदारसंघातील बुलढाणा तालुक्यातील नागरिकांसाठी त्यांनी आतापर्यंत प्रत्येक गावात महिला बचत भवन, अंगणवाडी इमारती, जिल्हा परिषद शाळांसाठी वर्गखोल्या, गावजोड रस्ते, पाणी पुरवठा योजना, वीजपुरवठा, नवीन ट्रान्सफॉर्मर, पाणंद रस्ते आदी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे त्या म्हणाल्या. गावकऱ्यांनी विकासासाठी लोकचळवळ उभी करावी, अशीही त्या वेळेस ग्वाही दिली. आमदार महाले पुढे म्हणाल्या की, ज्या गावांना पाणंद रस्त्यांची गरज आहे, त्या प्रत्येक गावाला मी माझ्या आमदार निधीतून ५ लाख रुपये देणार आहे. हे समृद्ध पंचायत राज अभियान १७ सप्टेंबरपासून सुरू होत असून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत चालणार आहे. या काळात आपल्या चिखली मतदारसंघाला बक्षीस मिळालेच पाहिजे, यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करावेत. मी नेहमीच आपल्या पाठीशी उभी आहे.या कार्यक्रमास गटविकास अधिकारी श्री. सुरेश तायडे, श्री. एल. पी. सुरडकर, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष श्री. देविदास पाटील जाधव, सावळीचे सरपंच डॉ. श्री. तेजरावजी नरवडे, भाजपा तालुकाध्यक्ष श्री. अनिलजी जाधव, सरपंच संघटनेचे अध्यक्ष श्री. अनिलभाऊ फेपाळे, श्री. विष्णूभाऊ वाघ, धाडच्या सरपंच सौ. सावित्रीबाई बोर्डे, सौ. अनुराधाताई भुसारी, सरपंच संघटनेचे सचिव श्री. देवा बर्डे, श्री. गजानन लांडे पाटील, ग्रामसेवक संघटनेचे श्री. संदीप शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# अखेर मेहकर च्या गवळीपुरा येथील शादीखान्याचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले उदघाटन

जनसंचलन/बुलढाणा

मेहकर-लोणार विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते मेहकरच्या गवळीपुरा येथील शादीखान्याचे भूमीपूजन आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले. मेहकर येथिल गवळीपूरा येथे शादींखाना करण्याची मागणी येथिल नागरिकांनी अनेक वर्षांपासून केली होती . या साठी विशेष नागरी सुविधा अंतर्गत रू ४० लक्ष खर्चाच्या कामांची निविदा मंजूर होती . तसेच बालाजी कन्स्ट्रक्शन ला कामाची निविदा देखिल देण्यात आली होती परंतु तरिही नगरपरिषदेच्या ढिसाळ कारभारामुळ शादीखान्याचे काम सुरू होऊ शकले नव्हते. या संदर्भात गवळीपुरा येथिल नागरिकांनी आमदार खरात यांच्या कडे या कामासाठी सतत पाठपुरावा सुरू



ठेवला होता . त्यानुसार आज दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी या कानाचे भूमीपूजन आमदार सिद्धार्थ खरात यांनी आज केले . या प्रसंगी मेहकर नगरपालिका प्रशासक रामराजे कापरे, शहर प्रमुख किशोर गारोळे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, युवासेना तालुका अधिकारी ॲड. आकाश घोडे, ॲड. संदीप गवई, संदीप गारोळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपजिल्हा प्रमुख निसार अन्सारी, रफिक हसन गवळी, छोटू गवळी, इमाम गवळी, बापू पर्सुवाले, रहीम चौधरी, जंगली रोहिवाले, हसन पिरु नवरंगाबादी, फिरोज रहमान, निन्नु भाई यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व गवळीपुरा येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गवळीपुरा परिसर गेल्या अनेक वर्षांपासून विविध समस्यांनी ग्रस्त होता. घाणीचे साम्राज्य, पायाभूत सुविधांचा अभाव या कारणांनी नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी आमदार खरात सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ४० लक्ष रुपये खर्चाचा शादीखाना तसेच १० लक्ष रुपयांचा संरक्षणभिंतीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामामुळे गवळीपुरातील खुल्या भूखंडात साचलेली घाण दूर होऊन एक भव्य व आधुनिक इमारत उभी राहणार आहे. यामुळे नागरिकांची दीर्घकाळची समस्या दूर होऊन सोयीसुविधांनी युक्त जागा उपलब्ध झाली आहे. नागरिकांच्या मुलभूत गरजांकडे लक्ष देत समस्यांचे निराकरण करण्याचे काम आमदार खरात यांनी हाती घेतल्यामुळे गवळीपुरा परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर कामाच्या वॉल कंपाऊंट साठी अधिकचा निधी लागल्यास उपलब्ध करून देण्यात येईल असेही आमदार सिद्धार्थ खरात यांनी सांगितले.

# शिवसेना उबाठाच्या इशाऱ्यानंतर महावितरण कंपनीनें केली हाई पावर लाइन स्थलांतरित

## ४० वर्षांची समस्या झटक्यात सोडविली म्हणून नगरवासीयांकडून डॉ. बछिरे, शैलेश सावजी व गजानन जाधव यांचा जाहीर सत्कार

जनसंचलन/ लोणार

४० वर्षांपूर्वीचे महावितरण कंपनीचे ११ केव्हीची हाई पावर लाईट काटेनगर वस्तीतून जाणारी लाइन शिवसेना उबाठाचे जिल्हा संघटक डॉ गोपाल बछिरे यांच्या इशाऱ्यानंतर महावितरणने तीन दिवसात केली स्थलांतरित सविस्तर बातमी अशी की काटे नगर लोणार येथील रहिवाशी वस्तीत ४० वर्षापासून १८ फूट उंचावरून ११ केव्ही ची हाय पावर लाईट रहिवाशांच्या घरावरून गेली होती यापूर्वी दोन वेळा या लाईनचे तार तुटून दोन लोकांचे बळी गेलेली आहे तिसऱ्यांदा पुन्हा ही तार तुटली सुदैवाने कोणीही दगावले नाही वेळोवेळी तार तुटण्याचे कारण हाय पावर खंब्यावर लावण्यात आलेली तार ही १० एम.एम. ची एल टी तार आहे आणि म्हणून हे अपघात झाले असा आरोप डॉ गोपाल बछिरे यांनी केला सदरील अपघात होताच नगरवासीयांनी शिवसेना उबाठा चे जिल्हा संघटक डॉ गोपाल बछिरे, शहर प्रमुख गजानन जाधव यांना फोनवरून घटनेची माहिती मिळताच ते घटनास्थळी पोहोचले सोबत माजी जिल्हा परिषद सदस्य शैलेश सावजी होते डॉ बछिरे महावितरणच्या अभियंत्यास फोन करून बोलावून घेतले त्याच दरम्यान जिल्हाधिकारी व महावितरण चे जिल्हा अधीक्षक अभियंता यांच्याशी फोनवर घटनेची माहिती देऊन तीन दिवसात सदरील लाईट स्थलांतरित करण्यात यावी अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल व याचे परिणाम महावितरण कंपनीस भोगावे लागतील असा इशारा देताच ४० वर्षांपूर्वीची ही रहिवासी क्षेत्रातील हाई पावर लाईट तीन दिवसाच्या आत काटे नगर बाहेर काढण्याचे काम सुरू केले व आज संपूर्ण लाईटचे पोल काटे नगर बाहेर स्थलांतरित करून महावितरण कंपनीने लोटांगण घेतल्याचे दिसून आले या कारणाने काटे नगर वासीयांनी व माजी नगरसेवक अंबादास



इंगळे यांनी डॉ गोपाल बछिरे, शैलेश सावजी, गजानन जाधव यांचा जाहीर सत्कार केला याप्रसंगी काँग्रेसचे नेते प्रकाश धुमाळ, माजी नगरसेवक नितीन शिंदे, शेख समद शेख अहमद, सुदान अंभोरे सर,श्रीकांत मादनकर, विकास मोरे, अशपाक खान, फहीम खान, एजाज खान, तानाजी अंभोरे, तानाजी मापारी यांची प्रमुख उपस्थित होते व मोठ्या संख्येने नगरवासी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन शिंदे यांनी केले तर आभार अंबादास इंगळे यांनी मानले.

# श्री पुंडलिक महाराज महाविद्यालयात माय भारत पोर्टल सामूहिक नोंदणीसाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

जनसंचलन/बुलढाणा

राष्ट्रनिर्माणात युवकांचा सक्रिय सहभाग वाढावा, यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेल्या ङ्गमाय भारतफ पोर्टलवर युवकांची सामूहिक नोंदणी करण्यासाठी श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय, नांदुरा रेल्वे, जि. बुलडाणा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मंगळवार, दि.०९/०९/२०२५ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अलका मानकर यांच्या उपस्थितीत रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. शांताराम भोये, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. सुनंदा डेकाटे आणि सह-कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अमोल निपटे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि महामानवांच्या प्रतिमा पूजनाने झाली. माय भारतफ हे पोर्टल युवकांना विविध राष्ट्रीय कार्यक्रम, स्वयंसेवी उपक्रम आणि कौशल्यविकास योजनांमध्ये सहभागी होण्यासाठी एक प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देते. या पोर्टलद्वारे देशभरातील युवकांना त्यांची क्षमता ओळखून सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रात कार्य करण्याची संधी दिली जाते. कार्यक्रम अधिकारी प्रा. शांताराम भोये यांनी प्रास्ताविकमध्ये या कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट करताना



सांगितले की, वद्यार्थ्यांना सामाजिक कार्याच्या संधींबरोबरच शासकीय पातळीवर सुरू असलेल्या योजनांची माहिती मिळावी, यासाठी या सामूहिक नोंदणीचा उपक्रम राबवण्यात आला आहे. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पोर्टलवर नोंदणी करून दाखवली आणि मार्गदर्शन केले. प्राचार्या डॉ. अलका मानकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात युवकांमधील ऊर्जा राष्ट्रनिर्मितीसाठी वापरली जावी, यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले. त्यांनी ङ्गमाय भारतफ पोर्टलसारख्या डिजिटल उपक्रमांचे कौतुक करत रासेयो विभागाच्या कार्याची प्रशंसा केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रासेयोच्या स्वयंसेवकांनी विशेष मेहनत घेतली. पोर्टलवर नोंदणी करताना स्वयंसेवकांनी एकमेकांना मदत केली आणि शिस्तबद्ध वातावरणात संपूर्ण प्रक्रिया पार पडली. अनेक विद्यार्थ्यांनी नोंदणी प्रक्रियेमुळे मिळालेला आत्मविश्वास आणि माहितीबाबत समाधानींव्यक्त केले

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८